चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

११ नोव्हेंबर, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानीक गुन्हे शाखेची आयपीएल जुगार विरूध्द कार्यवाही

## १ लाख ४५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १०/११/२०२० रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पथकास पो.स्टे. तळोधी परीसरात पेट्रोलिंग करीता असतांना गोपणीय माहीती मिळाली की तळोधी येथे राहणारे वसीम छुकारीया वय २५ वर्षे, व त्याचा भाउ तोहीद छुकारीया वय ३२ वर्षे, दोन्ही हे दोघेही दुबई येथील इंटरनॅशनल स्टेडीयम वर सुरू असणा—या आयपीएल चे मुंबई विरूध्द दिल्ली फायनल क्रिकेटच्या मॅचवर लोकांकडुन पैसे घेवुन पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार मोबाईलवर पाहुन खेळ खेळीत असल्याचे खबरेवरून त्याचे राहते घरी पथकाने छापा टाकला असता तेथे ४ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल, जुगाराचे आकडे लिहीलेल ३ नोटबुक, नगदी रक्कम असा एकुण १,४५,०००/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीतांनी सदर आयपीएल सट्टयाची उतारी निकु भैसारे रा. सिंदेवाही याला देत असल्याचे सांगीतले. वरील तिन्ही आरोपींविरूध्द पो.स्टे. तळोधी अप.क्र. २९३/२० कलम ४,५ म.जु.का. सहकलम १०९ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आला. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास तळोधी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. अरविंद साळवे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर पोलीस निरिक्षक श्री. खाडे यांचे नेतृत्वात सपोनि. जितेंद्र बोबडे, पोहवा. धनराज करकाडे, नापोशि. गजानन नागरे, पोशि. अमोल धंदरे, प्रशांत नागोसे, गोपाल आतकुलवार, विनोद जाधव यांनी पार पाडली.

———————————————————————————————————